


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २१ बुधवार ४ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# कोंबडया फस्त करायला गेला, बिबट्या खुराड्यात अडकला !

## निघोजच्या लामखडे वस्तीवरील घटना


**निघोज : संदीप इधाटे**

दिवसेंदिवस पारनेर तालुक्यातील बिबटयांची संख्या लक्षणीय वाढली असून भक्ष्याच्या शोधासाठी बिबटयांकडून आता मानवी वस्त्याही लक्ष्य केल्या जाऊ लागल्या आहे. असाच भक्ष्याच्या शोधात निघोजच्या लामखडे वस्तीवर आलेला बिबटया कोंबडयांच्या खुराडयात अडकला असून वन विभागाचे कर्मचारी त्यास जेरंबद करण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करीत आहेत.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार निघोजच्या कुंड परिसरातील कोळीवाडा हॉटेलच्या पाठीमागे गणेश लामखडे यांची शेती आहे. या शेतीमधील उसाच्या फडालगत असलेल्या कोंबडयांच्या खुराडयातील कोंबडयांना बिबटयाने सोमवारी रात्रीच्या सुमारास लक्ष्य केले. कोंबडया फस्त केल्यानंतर खुराडयात उतरलेल्या बिबटयाला बाहेर पडणे मुश्किल झाले. तो बाहेर येणाचा प्रयत्न करत होता, त्याचे प्रयत्न अपुरे पडले.

कोंबडयांच्या खुराडयात बिबटया असल्याचे लामखडे परिवारातील सदस्यांच्या सोमवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास लक्षात आहे. खुराडयाबाहेर पडण्याची तो धडपड करत होता. त्यामुळे तिथे जमलेल्या व्यक्तींनी तिथून लांब जाण्याचा निर्णय घेतला. त्यासंदर्भात वन विभागाचे वनपरीक्षेत्र अधिकारी गजानन धाडे यांना माहीती देण्यात आल्याने वन विभागाचे अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे, वनपाल रेश्मा पाठक, पाठक, वनरक्षक संदीप कार्ले, तसेच साबळे, शेख, सातपुते, वाढवणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असता त्यासाठी बचाव पथकाची आवष्यकता असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर बिबटयाला पकडण्यासाठी संगमनेर येथून बचाव पथक पाचारण करण्यात आले. बचाव पथकाचे अथक परिश्रम उशिरापर्यंत सुरू होते.





निघोजच्या लामखडे वस्तीवरील खुराडयातील कोंबडया फस्त केलेला बिबटया खुराडयात अडकून पडला.(छाया : संदीप इधाटे)

### शेतकऱ्यावर हल्ला

तालुक्यातील सिध्देश्वरवाडी येथील एका शेतकऱ्यावर बिबटयाने हल्ला करून त्यांना जखमी केल्याची घटनाही ताजी आहे. या शेतकऱ्यावरील हल्ल्यानंतर औषधोपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेचा वन विभागाच्या अधिका-यांनी पंचनामा केला असून लवकरच शेतकऱ्यास वन विभागाच्या वतीने भरपाई देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### अनेक पाळीव प्राण्यांचा बळी

बिबटयांची संख्या वाढल्याने भक्ष्याच्या शोधात त्यांचा मानवी वस्त्यांच्या परिसरात राजरोस संचार वाढला आहे. अनेक वस्त्यांवरून पाळीव कुत्री, शेळया, मेंढयांना बिबटयांनी फस्त केले आहे. तालुक्याच्या मेंढपाळ बहुल भागातही मेंढयांच्या कळपावर बिबटयांनी हल्ले केल्याच्या घटनाही अनेक घडलेल्या आहेत. पाळीव प्राण्यांबरोबरच रात्रीच्या वेळी नागरीकांवरही हल्ले करून बिबटयांनी त्यांना जखमी केले आहे.

### वन विभागाकडून बंदोबस्त आवष्यक

गेल्या काही वर्षांत तालुक्यातील बिबटयांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे नागरीक, पाळीव प्राणी यांच्यावरील हल्ले हे नित्याचेच झाले आहे. एखादी घटना घडल्यानंतर वन विभागाकडून पिंजरे लाऊन बिबटे जेरबंद करण्यासाठी हालचाली केल्या जातात. लोक विसरून गेल्यानंतर त्या मोहिमेकडे दुर्लक्ष होते. बिटयांचा कायमचा बंदोबस्त करण्याबाबत वन विभागाने ठोस भुमिका घेणे गरजेचे आहे.



आ. काशिनाथ दाते यांचे चिरंजीव दिलीप दाते, डॉ. प्रदीप दाते व मंगेश दाते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत भेट घेतली.

# पक्षसंघटना वाढीची जबाबदारी दिलीप दातेंवर !

## गाव तिथे राष्ट्रवादीची शाखा सुरू करा; अजित पवार यांच्या सुचना

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वांनी एकत्र येत महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांची विजयश्री खेचून आणली असून आता पक्ष संघटना वाढीसाठी गाव तिथे राष्ट्रवादीची शाखा सुरू करण्याच्या सुचना देतानाच पक्ष संघटन वाढीची जबाबदारी आ. काशिनाथ दाते यांचे ज्येष्ठ चिरंजिव उद्योजक दिलीप दाते यांच्यावर सोपविण्यात आली.

आ. काशिनाथ दाते यांचे चिरंजीव दिलीप दाते, डॉ. प्रदीप दाते, मंगेश दाते यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबईत अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर भेट घेतली. यावेळी पवार यांनी दाते कुटूंबियांशी संवाद साधत जोमाने कामाला सुरूवात करण्याचा सल्ला दिला.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, या निवडणूकीमध्ये सर्वांची मदत झाली असून भविष्यात सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करायची आहे. मतदारसंघातील विविध विकास कामे माग लावण्यासाठी विशेष निधी देण्यात येणार असून त्याची जबाबदारी आपण घेत असल्याचे पवार यांनी सांगितले. लवकरच मंत्रालयात अधिकाऱ्यांची बैठक बोलवून कामांचे नियोजन करण्यात येणार असल्याचेही पवार म्हणाले.

पवार म्हणाले, राजकीय मतभेद विसरून सर्वांनी विकासासाठी एकत्र यावे. विधानसभेप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत महायुतीचे उमेदवार मोठया संख्येने विजयी होतील यासाठी पक्ष संघटना मजबुत होणे गरजेचे आहे.

जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अजित पवार यांना भेटलेल्या शिष्टमंडळात दाते परिवारातील सदस्यांसह उद्योजक राजेंद्र औटी, संजय शिरोळे, दिपक गडाख, ॲड. युवराज पाटील, सचिन दाते, अशोक आहेर, अर्जुन आहेर, राजू चव्हाण आदी उपस्थित होते.

### अजितदादांचा वादा पुर्ण होणार !

पारनेर तालुका पुन्हा राष्ट्रवादीमय होणार आहे. विकास कामे करण्यासाठी अजित पवार हे झुकते माप देणार आहेत. आ. काशिनाथ दाते हे सर्वांना बरोबर घेउन काम करणारे नेते आहेत. पारनेर-नगर मतदारसंघाची दाते यांच्या माध्यमातून आता वेगळी ओळख निर्माण होणार आहे. अजितदादांनी वादा केला आहे. तो शंभर टक्के पुर्ण होणार आहे.

- प्रशांत गायकवाड
संचालक, जिल्हा सहकारी बँक

### व्यवसायिक प्रगती सुरू ठेवा

अजित पवार यांनी दिलीप दाते यांच्याकडून उद्योग व्यवसायांची माहीती घेतली. उद्योग व्यवसायातील प्रगती अशीच सुरू ठेवण्याचा सल्ला देण्याबरोबरच पारनेर तालुक्यात पक्षसंघटना वाढली पाहिजे. गाव तिथे पक्षाची शाखा स्थापन करण्याची जबाबदारी दिलीप दाते व त्यांच्या सहकाऱ्यांवर पवार यांनी सोपविली.

# सर्वच शंकास्पद म्हणून बाबा आढाव यांचा आत्मक्लेश

## खा. नीलेश लंके यांचे पुण्यात वक्तव्य; बाबा आढाव यांची घेतली भेट

**पुणे : प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणूकीत तांत्रीक गोष्टींमुळे अनेक उमेदवारांचा पराभव झाला आहे. या निवडणूकीत सर्वच शंकास्पद असल्याने बाबा आढाव यांना वयाच्या ९५ व्या वर्षी आत्मक्लेश आंदोलन करावे लागल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.

लोकसभा निवडणूकीनंतर विधानसभा निवडणूकीमध्ये झालेल्या मोठया परिवर्तनावर शंका घेत बाबा आढाव यांनी पुण्यात आत्मक्लेश आंदोलन केले. खा. नीलेश लंके यांनी शनिवारी सायंकाळी बाबा आढाव यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

खा. लंके म्हणाले,अनेक मतदारसंघांमध्ये झालेले मतदान आणि ईव्हिएम मशिनवर आलेले मतदान यात तफावत आढळून आलेली आहे. ज्या गावांमध्ये विरोधकांचे बुधही नव्हते, त्यांचा मतदान प्रतिनिधी नव्हता, तिथेही विरोधकांना मताधिक्य मिळाले आहे. या सर्व गोष्टी शंकास्पद गोष्टी आहेत. यामुळेच ९५ वर्षांचे असतानाही बाबा आढाव यांनी पुण्यात आत्मक्लेश केला. याच कारणामुळे अनेक ठिकाणी लोक आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे खा. लंके म्हणाले.

खा. लंके पुढे म्हणाले, बाबा आढाव यांच्यासोबत काही तज्ञ लोक आहेत. त्यांनी तर अतिशय धक्कादायक माहिती दिली आहे. मतदानासाठी ईव्हिएम मशिन तयार करणाऱ्या कंपनीच्या तीन संचालकांमध्ये भाजपाचे गुजरात, बिहारचे माजी पदाधिकारी आहेत.अशा अनेक गोष्टी समाजापुढे येत असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.



निवडणूकीमधील ईव्हिएम घोटाळयासंदर्भात बाबा आढाव यांनी आत्मक्लेश आंदोलन केल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी त्यांची सायंकाळी पुण्यात भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली.

### हक्काच्या गावांत ५०,१०० मतांची आघाडी

आमच्या मतदारसंघात अशी काही गावे होती तिथे आमच्या उमेदवाराना एक हजार, दिड हजार मतांचे लिड मिळणे अपेक्षित होते. तिथे प्रत्यक्षात ५०,१०० मतांची आघाडी मिळाली. आजही लोकांचा कौल घेतला तर आम्ही विरोधकाला मतदान केलेच नाही असे ते सांगत आहेत.

- नीलेश लंके, खासदार, लोकसभा

### नगर जिल्हयातही संशयास्पद

आमच्या मतदारसंघाच्या बाजूला बाळासाहेब थोरात यांचा मतदारसंघ आहे. तिथेही अशीच स्थिती आहे. शंकरराव गडाख, प्राजक्त तनपुरे यांच्या मतदारसंघातही शंकास्पद निकाल आहेत. राहुरी हे प्राजक्त तनपुरे यांचे होमग्राउंड आहे, तिथेही त्यांना मताधिक्य मिळाले नाही. राज्यात अनेक ठिकाणी असे प्रकार घडले आहेत. कराडमध्ये बाळासाहेब पाटलांचाही अशा तांत्रीक गोष्टींमुळे पराभव झाला असल्याचे लंके यांनी सांगितले.

# शपथविधीबाबत मंत्रालयात मोठ्या हालचाली

## मुख्य सचिवांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक; भाजपचे बडे नेते रवाना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तर महाविकास आघाडीला मोठा फटका बसला आहे. निवडणुकीचा निकाल लागून ११ दिवस उलटले असले तरी अद्याप राज्यात सरकार स्थापन झालेले नाही. त्यातच महायुती सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला होणार असल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईच्या आझाद मैदानावर जोरदार तयारीला देखील सुरुवात झाली असून आता शपथविधी संदर्भात मंत्रालयात मोठ्या हालचाली सुरु झाल्या आहेत.



नव्या सरकारच्या शपथविधी संदर्भात मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक सुरू झाली आहे. मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या दालनामध्ये ही बैठक पार पडत आहे. बैठकीला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, प्रोटोकॉल विभागाच्या प्रधान सचिव मनिषा म्हैसकर आणि इतर अधिकारी उपस्थित आहेत. तर मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलिस आयुक्त देवेन भारती, कायदा व सुव्यवस्था विभागाचे सत्यनारायण चौधरी देखील बैठकीला उपस्थित आहेत. या बैठकीत ५ डिसेंबरला होणाऱ्या शपथविधी संदर्भात तयारीचा आढावा घेतला जात असल्याची माहिती मिळत आहे.

**पंतप्रधान मोदींसह बडे नेते शपथविधीला उपस्थित राहणार**

दरम्यान, आझाद मैदानावर होणाऱ्या शपथविधी समारंभाच्या पूर्वतयारीचा आढावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दरेकर व देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी घेतला आहे. अजित पवार गटाचे नेतेही यावेळी हजर होते. मात्र, शिंदेसेनेचा एकही नेता नव्हता. त्यामुळे शिंदेंची शिवसेना नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. तर शपथविधी समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजप आणि मित्रपक्षशासित विविध राज्यांचे मुख्यमंत्री, अनेक केंद्रीय मंत्री, विविध धार्मिक, आध्यात्मिक संत, गुरू उपस्थित राहणार आहेत.

### मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री शपथ घेणार?

आमदार प्रसाद लाड, भाजप नेते मोहित कंबोज हे सुजाता सौनिक यांना भेटण्यासाठी रवाना झाले आहेत. सुरक्षा व्यवस्था आणि शपथ ग्रहण कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी दोन्ही नेते सुजाता सौनिक यांच्या भेटीला पोहचत आहेत. व्हीआयपी आणि अतिव्हीआयपी यांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत देखील ते चर्चा करणार आहेत. दरम्यान, शपथविधीच्या दिवशी मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री शपथ घेणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. यासोबतच महायुतीचे काही आमदार देखील मंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडली

**मुंबई : प्रतिनिधी**

महायुती सरकारचा शपथविधी अवघ्या एका दिवसावर आला असताना काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिथे त्यांच्यावर घशाच्या संसर्गावर उपचार होणार असल्याची माहिती आहे.

एकनाथ शिंदे ३ दिवसांपूर्वी सातारा जिल्ह्यातील दरेगाव या आपल्या मूळ गावी गेले होते. तिथे त्यांना १०५ डिग्री ताप आला होता. त्यांना सलाईनही लावण्यात आली होती. मुंबईत परतल्यानंतर त्यांच्या प्रकृतीत काहीशी सुधारणा झाली. पण ताप उतरत नसल्यामुळे आता अखेर त्यांच्यावर रुग्णालयात जाण्याची वेळ आली आहे.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची डेंग्यू आणि मलेरियाची चाचणी करण्यात आली होती. मात्र, या दोन्ही चाचण्या नेगेटिव्ह आल्या आहेत. मात्र, पांढऱ्या पेशी कमी जास्त होत असल्याने अजूनही त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

# मारकडवाडीच्या ग्रामस्थांच्या धाडसाला सलाम !

## प्रशासनाच्या दबावानंतर 'तो' निर्णय मागे; नाना पटोले यांचे ट्वीट

**माळशिरस : प्रतिनिधी**

माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडीच्या गावकऱ्यांनी बॅलेट पेपरवर मतदान करण्याबाबत घेतलेला निर्णय अखेर मागे घेण्यात आला. प्रशासनाच्या दबावानंतर मतपत्रिकेवर मतदान करण्याची प्रक्रिया थांबवण्याची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार उत्तमराव जानकर यांनी घेतली. पोलिसांसोबत बैठक झाल्यानंतर मारकडवाडी येथील ग्रामस्थांशी चर्चा करुन जानकरांनी आपला निर्णय जाहीर केला. त्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ट्वीट करुन मारकडवाडीच्या ग्रामस्थांच्या धाडसाला सलाम केला आहे.

नाना पटोले यांचे ट्वीट काय?

मारकडवाडीच्या ग्रामस्थांच्या धाडसाला सलाम! विधानसभा निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडल्या नाहीत अशी राज्यातील जनतेला शंका आहे. आपल्या शंकेचे निरसन करण्यासाठी सोलापूरच्या मारकडवाडी ग्रामस्थांनी आज (मंगळवार, ३ डिसेंबर) मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची तयारी केली होती. पण प्रशासनाने जमावबंदी आदेश लागू करून, पोलिसी बळाचा वापर करून गावकऱ्यांना मतदानापासून रोखले. मारकडवाडीमध्ये प्रशासन ब्रिटिशांप्रमाणे वागत आहे. त्यामुळे ईव्हीएम आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मतदान प्रक्रियेत काही घोळ नाही तर प्रशासन एका छोट्या खेड्यात मतपत्रिकेद्वारे मतदान घ्यायला का घाबरत आहे? आपले बिंग फुटेल म्हणून?

ईव्हीएमवरचे मतदान निर्दोष आहे, त्यात काही घोटाळा नाही हे जनतेला पटवून देण्याची संधी प्रशासनाने भाजपच्या दबावामुळे गमावली आहे.

त्याचवेळी मारकडवाडीच्या ग्रामस्थांनी लोकशाहीच्या रक्षणार्थ एका मोठ्या लढ्याची सुरुवात केली. काँग्रेस पक्ष या लढाईत ग्रामस्थांसोबत आहे. या लढ्याचे आगामी काळात मोठ्या युद्धात रुपांतर होऊन लोकशाहीचा विजय होईल. डरो मत!






# युवा

# बोहल्या चढण्याआधी...

तुळशीविवाह पार पडल्यानंतर आता विवाहेच्छुकांच्या घरी लग्नाची चर्चा सुरू झाली आहे. मुलगी पाहिली नसेल पाहण्याची तयारी, आवड-निवड या गोष्टींवर मतमतांतरे व्यक्त होत आहेत. मुलगी कशी असावी, मुलगा कसा असावा, यावरून काही गोष्टी ठरवल्या जात आहेत. लगीनघाईला वेळ असला तरी पसंतीसाठी मात्र हालचाली सुरू झाल्या आहेत. मुलगी पहायला जाताना, मुलगा पसंत करताना निर्णय घेण्याची घालमेल निर्माण होऊ शकते, ती दूर करण्याचा हा प्रयत्न...



## सासरच्या मंडळींना पहिल्यांदा भेटताय ?

**प्रत्येक जोडप्याच्या आयुष्यातील लग्न हा असा क्षण असतो जो खास करण्यासाठी न जाणो ते कित्येक स्वप्नं रंगवतात आणि त्या क्षणाची आतुरतेने वाट पाहतात. अर्थात लग्नापर्यंतचा प्रवास हा तितकासा सोपा नक्कीच नसतो. एकीकडे मनात सतत अस्वस्थता पसरलेली असते आणि दुसरीकडे पहिल्याच भेटीत सासरच्या मंडळींचं मन जिंकणं एखाद्या कठीण परीक्षेपेक्षा कमी नसतं. कारण लग्न हे कोणा एका व्यक्तीसोबत जुळलेलं नातं नसतं, तर दोन कुटुंबांचं मिलन म्हणजेच लग्न! त्यामुळे नवऱ्याचं मन जिंकतानाच सासू-सासऱ्यांच्या मनात आपलं विशेष स्थान आणि आदर बनवण्याची जबाबदारी ही एका मुलीसाठी चिंतेचा विषय असते.**

प्रत्येक कुटुंबासोबत तेथील वागणूक, संस्कार, राहणीमान सारंच बदलतं. जसं की काही घरात सुनेने चूक केल्यास तिच्यावर सर्वजण चिडतात, अपमान करतात, नाराज होतात, उलटसुलट बोलतात तर काही ठिकाणी तिची चूक अगदी हसत खेळत स्वीकारून तिला समजावून सांगितलं जातं. त्यामुळे सासरच्या लोकांना ओळखण्यात आणि तसं वागण्यात सर्वात मोठी कसोटी लागते ती नव्याकोऱ्या नवरीची. पण हेच तुम्ही लग्नाआधीच त्यांच्या मनात स्वतःसाठी जागा केली तर लग्नानंतरचा प्रवास फारच सुखकारक होऊ शकतो. तुम्हालाही तुमच्या सासरच्या मंडळींचे मन जिंकायचे असेल तर काही टिप्स नक्की ट्राय करा.

### सारं काही जाणून घ्या

जसं एखाद्या कंपनीत आपल्याला मुलाखतीसाठी जायचं असेल तर आपण पूर्व रिसर्च करतो अगदी तसंच लग्न ठरताना किंवा सासरच्या मंडळींना पहिल्यांदा भेटताना त्यांच्याबद्दल रिसर्च का करू नये? जर तुम्ही सासरच्या मंडळींना किंवा होणाऱ्या नवऱ्याला पहिल्यांदा भेटायला जात असाल तर त्यांच्याबद्दल जास्तीत जास्त माहिती जाणून घ्यायचा प्रयत्न करा. म्हणजेच त्यांच्या आवडत्या- नावडत्या सर्व गोष्टींबद्दल माहिती मिळवून त्यांचं मन जिंकण्यासाठी तयार राहा. आधीच माहिती असल्यामुळे साहाजिकच त्यांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर तुम्ही बरोबरच देऊ शकाल.

### हसतमुख राहा

असं म्हणतात एखादा हसरा चेहरा कायम हृदयावर छाप पाडून जातो. असं मुळीच नाही की विनाकारण आणि सतत सासरच्या मंडळींसमोर हसत राहावे तर बोलताना किंवा एखाद्या चर्चेला प्रत्युत्तर देताना चेहऱ्यावर एक हलकेसे गोड हसू जरूर ठेवा. यातून तुमचा आत्मविश्वास आणि तुम्ही अजिबात अहंकारी नाही हे सिद्ध होतं. मनात धाकधूक असतानाही चेहऱ्यावर हसू ठेवलं तर तुम्हाला व समोरील व्यक्तीलाही सकारात्मक वाटू शकतं. पण त्यांना प्रभावित करण्यासाठी गरजेपेक्षा जास्त बोलणंदेखील घातक ठरू शकतं. त्यामुळे हलकसं हसू, गरजेपूरतं व मुद्देसुद बोलणं, थोडक्यात उत्तरं देणं त्यांचं मन जिंकू शकतं.

### भेटवस्तू घेऊन जा



जर तुम्ही सासरच्या मंडळींची आवड-निवड जाणून घेण्यात यशस्वी झालात तर पहिल्या भेटीत त्यांच्यासाठी भेटवस्तू जरूर घेऊन जा. सासू-सासरे आई-वडिलांसमानच असतात. त्यामुळे जसं आपल्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील असतो तसं त्यांच्याही आनंदाचा विचार केला तर होणारा नवराही खुश होईल आणि ते देखील! पण भेटवस्तू निवडताना ती त्यांच्या आवडीची व कामाची असेल याची काळजी घ्या. उदाहरणार्थ, तुमच्या सासूला विविध पाककृती ट्राय करायला आवडत असेल तर तुम्ही तिच्यासाठी एखादं रेसिपी बूक किंवा स्वयंपाकघरातील एखादी वस्तू भेट म्हणून देऊ शकता.

### मुळ संस्कार

आपल्या भारतीय संस्कृतीत मोठ्या लोकांना आदरार्थ नमस्कार करणं किंवा खाली झुकून त्यांच्या पाया पडणं हे संस्कार व संस्कृतीचा भाग मानलं जातं. मुलगी असो वा मुलगा, कितीही शिक्षण घेतलं तरी घराची जबाबदारी सांभाळताना त्यांना कुटुंबीयांना बांधून ठेवण्यासाठी त्यांच्या संस्कारांचा आदर करताच आला पाहिजे. आजकालची मुलं भरपूर शिकलेली असतात. त्यामुळे सासू- सासऱ्यांना त्यांच्याकडून जास्त काही अपेक्षा नसतात. पण आपण अचानक पाया पडून किंवा नमस्कार करून आपली शिकवण दाखवून दिली तर आपल्यासोबत आपल्या आई-वडिलांचीही वाहवाह होऊ शकते.

### कपड्यांवर द्या लक्ष

आजकालची पिढी कपडे, फॅशन याबाबतीत सर्वात जास्त सजग आणि पुढे आहेच. पण जेव्हा सासरच्या मंडळींना म्हणजेच फ्युचर इन लॉज यांना भेटायची वेळ येते तेव्हा मात्र तुमची मॉडर्न आणि छोटे छोटे कपडेवाली स्टाईल घरीच सोडावी लागेल. इथे तुम्हाला फॅशनेबल तर दिसायचं आहे पण कोणत्याही हाय-फाय फॅशनविनाच! म्हणजेच तुम्हाला वाटत असेल की वेशभूषेच्या बाबतीत सासूने पहिल्या नजरेत तुम्हाला पसंत करावं तर तुम्ही एखादा छानसा ड्रेस घालूनच त्यांच्या समोर जा. कारण पूर्वीच्या काळातील लोकांचा कल संस्कार आणि संस्कृती जपण्याकडे जास्त असतो. त्यामुळे तुमचे छोटे छोटे कपडे आपल्या घराचं नाव खराब करतील असा समज होऊन नाराजी ओढावून घेऊ नका. त्यांच्या आवडीपासून सुरुवात करून आपल्या आवडीच्या गोष्टींची परवानगी त्यांच्याकडून मिळवण्यापर्यंत तुम्हाला संयम बाळगावा लागेल.



## लग्नासाठी जोडीदार पाहायला जाताना नकोत या चुका!

**तुमचं लग्नाचं वय झालंय ?, लग्नासाठी जोडीदार बघण्यासाठी तुम्ही सुरुवात केलीय ? तुमच्या अपेक्षांची एक यादीही तयार केलीय ? मग तुम्हाला काय चुका टाळायला हव्यात हे देखील माहीत असायला हवे. लग्न हा आयुष्यातील सगळ्यात मोठा निर्णय आहे तो असा कसाही घेऊन चालत नाही. फार विचार करून हा निर्णय घेणे गरजेचे असते. लग्नासाठी कोणतेही स्थळ बघायला घेतल्यानंतर सगळ्यांचा गोंधळ उडणे स्वाभाविक आहे. कारण बरेचदा जे मनाशी ठरवले असते ते सगळे मिळेलच असे सांगता येत नाही. कधी त्याहून जास्त तर कधी त्याहून कमी असं कमी- जास्तच हे प्रमाण ठरलेलंच असतं. पण एखाद्या मुलाला किंवा मुलीला भेटायला जाताना एकमेकांच्या वागण्यातून चुकीचा अर्थ दुसऱ्यांपर्यंत जाऊ नये असे वाटत असेल तर या काही चुका टाळा...**



### प्रसन्न राहा

तुम्ही लग्न करणार आहात. तुम्हाला जोडीदार मिळणार आहे. त्यामुळे आनंद हा तुमच्या चेहऱ्यावर असायला हवा. चेहऱ्यावर आनंद असेल तर त्या व्यक्ती समोरच्यालाही सकारात्मक उर्जेने भरलेल्या वाटतात. पडका चेहरा आणि एखादी व्यक्ती आवडली नसेल तर ते चेहऱ्यावर दाखवणे गरजेचे नसते. तुम्ही त्या काळासाठी चेहरा प्रसन्न ठेवला तर तुमच्याबद्दल एक चांगले मत तयार होते. अशापद्धतीने लग्न ठरवताना अनेकदा फोटो आणि प्रत्यक्ष व्यक्तीमध्ये बरीच तफावत असते. त्यामुळे होतं असं की, अनेकांचा मिटिंगचा मूड उडून जातो. त्यामुळे शक्य असेल तर प्रसन्न राहा.

- वेळ पाळा : खूप जणांना वेळ पाळायचं म्हणजे कसं काय जमवायचं ते कळत नाही. पण तुम्ही पहिली ही चूक केली तर तुमच्याबद्दल आधीच काही मत समोरच्याच्या मनात तयार झालेली असतात. त्यामुळे तुमच्या कपड्यांपेक्षाही वेळ ही महत्वाची असते. जर तुम्ही योग्य वेळेत गेला तर तुम्ही वेळेचं गणित जमवू शकता असे वाटते. काही जणांना उशिरा जायला आवडते. त्यामुळे समोरचा आपली वाट पाहतो ही गोष्ट अभिमानाची वाटते. पण असे अजिबात चांगले नाही. कोणत्याही योग्य कारणांशिवाय उशिरा जाणे टाळा. जर तुम्हाला उशीर होणार असेल तर तुम्ही त्या व्यक्तीला आधी फोन करुन कळवा. म्हणजे तुम्ही किती काळजी करता हे कळते. अनेकदा या गोष्टी मनात असतात .त्या आचरणात आणल्या जात नाहीत. त्यामुळे तुमच्याबद्दल एखाद्याच्या मनात गैरसमज निर्माण होऊ शकतो.
- पुढाकार घ्या : लग्नासाठी जोडीदार पाहायचा म्हणजे तुम्हाला त्याला जाणून घेणे अगदी गरजेचे आहे. एखाद्याला जाणून घेताना काही गोष्टींचा श्रीगणेशा हा तुम्हालाच करावा लागतो. तो श्रीगणेशा करा. बोलायला सुरुवात काही विषयांपासून करा. थेट विषयाला हात घालण्याऐवजी चौकशी किंवा एखादी छान कॉम्पलिमेंट एकमेकांना द्या. त्यामुळे एक चांगली सुरुवात होऊ शकेल. कोणत्याही नियमानुसार मुलीने बिल देऊ नये असा नियम नाही. मुलीही कॉफी शॉपमध्ये जाऊन खाण्याची ऑर्डर किंवा कॉफीचे बिल भरु शकतात. पण समोरची व्यक्ती बिल भरत असेल तर किमान त्याच्यासोबत उठून जाण्याची तसदी घ्या. त्यामुळे तुम्ही फुकटे नाहीत हे समोरच्याला कळते. खूप जणांचा हा अनुभव असेल की, काही जण बाहेर गेल्यावर काही खायला बघत नाही. एक भयाण शांतता करून बसतात. त्यामुळे नकारात्मक उर्जा अधिक तयार होते.
- बाता मारणे टाळा : काही जणांना बाता मारण्याची सवयच असते. सतत मोठेपणा आणि स्वतःच्या गोष्टी ऐकायला समोरच्या व्यक्तीला आवडतेच असे नाही. काहींना उगाचच सगळ्या गोष्टी सांगायला आवडते. जर तुम्हाला अशा बाता मारायची सवय असेल तर तुम्ही ती सवय कमी करा. अशी व्यक्ती पहिल्याच भेटीमध्ये अनेकांना आवडत नाही. त्यामुळे तुम्हाला अशी सवय असेल तर तुम्ही खूप गप्पा मारणे टाळा. समोरची व्यक्ती गपिष्ट असेल तर तुम्ही अगदी बिनधास्त गप्पा मारा. पण बाता मारू नका. यामध्ये तुमचा खरा स्वभाव असू द्या.
- रेंगाळू नका : काही जणांना निर्णय घेण्यासाठी खूप वेळ लागतो. अशावेळी ते स्थळ पाहून झाले तरी खूप वेळ रेंगाळत राहतात. तुमच्या रेंगाळण्याचा अर्थ समोरच्या कळाला नाही. तर तुम्ही संभ्रमात आहात असेच वाटते. त्यामुळे जर तुम्हाला एखादे स्थळ आवडले नसेल तर रेंगाळू नका. जो निर्णय आहे तो योग्य विचार करुन आणि योग्य वेळी द्या. कारण जर तुम्हाला हे स्थळ पसंत नसेल तर तुम्हाला पुढचे स्थळ पाहायला जायचे असते. त्यामुळे रेंगाळू नका. योग्य तो निर्णय घ्या.

### या गोष्टींची घ्या काळजी

**जुळवलेल्या लग्नात मुलीला बघायला जाणं हे सर्वात पहिली आणि महत्वाची प्रोसेस असते. जर तुम्ही लग्न करण्याचा विचार करत असाल किंवा मुलगी बघायला जाणार असाल तर काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. मुलगी बघायला गेल्यावर तिच्या घरचे लोक तुम्हाला बारकाईने बघत असतात. त्यामुळे काही खास गोष्टींची काळजी घ्या**

- बघायला जात असलेल्या मुलीच्या घरच्यांबाबत पूर्ण माहिती घ्या. घरातील लहान मुलांची नावे जाणून घ्याल तर तुमचं इम्प्रेशन पडेल.
- कपडे असे घाला ज्यात तुम्ही सहज असाल. जास्त फॅशनच्या फंद्यात विचित्र दिसाल असे कपडे परिधान करू नका.
- अनेकदा अनेकजण घाई गडबडीत काहीही बोलतात. हे टाळलं पाहिजे. जे बोलायचं आहे ते विचार करून बोला. तुमच्या बोलण्याचा चुकीचा अर्थही निघू शकतो.
- सर्वांना आत्मविश्वासाने भेटा. तुमच्या बसण्यात आणि चालण्यात आत्मविश्वास असायला हवा. याने




मुलीच्या घरच्यांवर तुमचं इम्प्रेशन पडेल.

- मुलगी बघायला गेल्यावर सतत फोनवर बोलत बसू नका. फारच अर्जंट असेल तरच फोन घ्या.
- तुम्हाला तिथे लोक काही प्रश्नही विचारतील. अशात तुम्ही शांतपणे उत्तरे द्या. अशावेळी कुणी काही विचारलंच तर इगो दुखावू देऊ नका. कारण तुम्ही इथे मुलगी बघण्यासाठी आला आहात.
- तुम्ही आहात तसे राहा. उगाच समोरच्यांना इम्प्रेस करण्यासाठी नाटकी वागू नका. ते कुणी नोटीस केलं तर तुमचं काम अवघड होईल.

## भावी जोडीदाराला आवर्जून विचारा ‘हे’ प्रश्न

**असं म्हणतात की नवरा बायकोचं नातं असं असतं की ज्यामुळे दोघेही एकमेकांच्या भावना न बोलता आणि न व्यक्त होताच समजू शकतात. सोबतच नवरा बायकोमध्ये कधी मतभेद किंवा वाद होणं हे देखील तितकंच सामान्य आहे हेही आपण समजू शकतो. वाढत्या जबाबदाऱ्या आणि कौटुंबिक वाद यामुळे नाती तुटताना देखील दिसून येतात. कधी कधी परिस्थिती अशी ठाकते की महिलांना आपला संसार वाचवण्यासाठी करिअरदेखील दावावर लावावे लागते. पण ज्या व्यक्तीसोबत आपण पूर्ण आयुष्य व्यतीत करणार आहोत तिच्याविषयी सर्व माहिती जाणून घेणं हे देखील आपलं कर्तव्य असतं.**



जर त्या व्यक्तीबद्दल इत्यंभूत माहिती असेल तर पुढे समस्यांचा सामना करावा लागत नाही. त्यातही मुलींना आपले घर सोडून परक्या लोकांच्या घरी आयुष्यभरासाठी जायचं असतं. त्यामुळे मुलाची पार्श्वभूमी तपासून मगच नवीन आयुष्याची सुरुवात करणं तिच्यासाठी व तिच्या कुटुंबीयांसाठी कधीही उत्तम असतं. पण तुम्हाला माहित आहे का लग्न ठरताना किंवा आयुष्याचा जोडीदार शोधताना मुलींनी कोणते प्रश्न मुलांना आवर्जून विचारले पाहिजे? मुलांबाबत कोणत्या गोष्टी जाणून घेणं अत्यंत आवश्यक असतं? आज आम्ही अशाच ५ प्रश्नांबाबत सांगणार आहोत जे तुमच्या आयुष्याचे शिल्पकार ठरतील.

- पर्सनल व प्रोफेशनल लाईफमध्ये किती साथ? : हल्लीच्या जमान्यात सर्वच कपल्स वर्किंग असतात. त्यामुळे सतत भांडणं आणि मतभेद होणं साधारण गोष्ट आहे. पण या परिस्थितीत तुमचा जोडीदार तुम्हाला किती समजून घेतो आणि साथ देतो हे जास्त गरजेचे असते. जोडीदार असा असावा पर्सनल ते प्रोफेशनल प्रत्येक गोष्टीतील समस्या सोडवण्यास मदत करतो. त्यामुळे लग्नाआधीच जोडीदाराला नक्की विचारा की तुमचं प्रोफेशनल लाईफ त्याच्यासाठी किती महत्त्वाचं आहे?
- एकमेकांना स्पेस देणं : नातं स्ट्राँग बनवण्यासाठी पती-पत्नी दोघांनी एकमेकांना आपली आपली स्पेस देणं गरजेचं असतं. कधी कधी एकमेकांना स्पेस न दिल्याने नात्यात दुरावा वाढू लागतो. त्यामुळे तुम्हीही जोडीदार शोधत असाल तर आपल्या छोट्या छोट्या गरजा आणि पर्सनल स्पेसबद्दल चर्चा करण्यास विसरु नका. आधीच त्याला या गोष्टीची जाणीव करुन दिल्यास पुढील धोके टाळता येऊ शकतात.
- घरखर्च आणि हिस्सा? : बहुतांश वर्किंग मुली या समस्येतून जात असतात. नवरा-बायको दोघे कमावते असतील तर बरेच प्रश्न सुटतात तर काही काही ठिकाणी ते पैशांमुळे वाढतात. त्यामुळे लग्नाआधीच आपल्या जोडीदाराशी घरखर्च आणि आपला वाटा याबद्दल चर्चा करणं आवश्यक आहे. दोघांनाही सेविंग्स करुन, आपली स्वप्न पूर्ण करुन कुटुंबाच्याही गरजा पाहायच्या असतात त्यामुळे प्लानिंग करुन पुढे गेलं तर वादाचा प्रश्नच उद्भवणार नाही आणि नातं सदाचिरतरुण राहिल.

### छोट्या कपड्यांबद्दल काय मत आहे?

आजकालच्या मुली आपल्या आवडी निवडी जोपासण्याबद्दल, करिअर करण्याबद्दल जितक्या जागरूक असतात अगदी त्याचप्रमाणे त्या कपड्यांच्या स्टाईलबद्दलही काळजी घेतात. कारण त्यांना फॅशनेबल आणि कम्फर्टेबल कपडे घालायला आवडतात. काही मुलांना आपली बायको कोणत्याही कपड्यांमध्ये आवडते जसं की लहान कपडे घालो, फॅशनेबल घालो, साडी नेसो त्यांना ती गोडच दिसते. तर दुसरीकडे अशीही मुलं असतात ज्यांना आपल्या बायकोने लहान कपडे घातलेले आवडत नाहीत त्यांना आपली पत्नी फक्त आणि फक्त साडी किंवा ड्रेसमध्येच वावरलेली आवडते जे की मुलींना घुसमटलेल्या नात्यासारखं वाटू लागतं आणि दोघांमध्ये मतभेद होण्यास सुरुवात होते.

### घरच्या जबाबदारीत किती योगदान?

आजच्या जमान्यात लग्न म्हणजे काही बाहुला-बाहुलीचा खेळ नाही की पती-पत्नीपैकी एकाच्या मनात काही आलं आणि कसंही वागलं! लग्नानंतर प्रत्येक जोडप्यासाठी सर्वात मोठं आव्हान हेच असतं की घरातील वाढलेल्या जबाबदाऱ्या स्विकारणं आणि स्वतःचं पूर्ण योगदान देऊन त्या सांभाळणं. त्यातही दोघेही तुम्ही वर्किंग असाल तर दोघांसाठीही हे सर्वात मोठं टास्कच आहे. त्यामुळे लग्न ठरताना तुम्ही आपल्या होणाऱ्या नवऱ्याला किंवा जोडीदाराला हे हमखास विचारलं पाहिजे की लग्नानंतरच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांबाबत तो किती चिंतीत आहे? हा प्रश्न यासाठी महत्त्वाचा आहे. कारण आई-बाबा झाल्यानंतर मुलाची सर्व जबाबदारी ही आईनेच म्हणजे स्त्रीनेच पूर्ण करावी अशा मताचे बरेच पुरुष असतात जे सरासर चूक आहे.

## शॉर्ट न्यूज

### महिलेची फिर्याद घेण्यास पोलिसांची टाळाटाळ

संगमनेर : विनयभंग झालेल्या महिलेची फिर्याद घेण्यास पोलिसांनी टाळाटाळ केल्याने सदर पीडित महिला संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारासमोरच झोपल्याची घटना घडली आहे. याबाबत समजलेली अधिक माहिती अशी, की तालुक्यातील एक महिला एका रुग्णालयात उपचार घेण्यासाठी गेली. तीन दिवस उपचार घेतले. त्यानंतर रुग्णालयातील एक कर्मचारी या महिलेसोबत लगट करू लागला. जेव्हा या कर्मचाऱ्याचे चाळे सुरू झाले तेव्हा पीडित महिलेच्या लक्षात आले.

### आ. लंघे यांना मंत्रिमंडळात घेण्याची मागणी

नेवासा : मतदारसंघातून विजयी झालेले आमदार विठ्ठलराव लंघे यांना राज्य मंत्रिमंडळात संधी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते अब्दुलभैय्या शेख यांनी केली आहे. शेख व कार्यकर्ते महायुतीच्या नेत्यांची भेट घेणार असून आ. विठ्ठलराव लंघे यांनी राज्य मंत्रिमंडळात संधी द्यावी, यासाठी निवेदनाद्वारे मागणी करणार आहेत. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असल्याने त्यांचे मंत्रिपद सर्वसामान्यांसाठी उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे आमदार लंघे यांना राज्य मंत्रिमंडळात संधी द्यावी, अशी मागणी अब्दुल शेख यांनी केली आहे.

### खर्डा येथे मोकाट जनावरांचा उपद्रव

जामखेड : तालुक्यातील खर्डा येथे बसस्थानक परिसर, राज्य मार्गावर मोकाट जनावरांचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे वाहन चालक, प्रवासी, नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. येथील ऐतिहासिक वाडे, निंबाळकरांची गढी, ताकभाते वाडा, आप्पासाहेब निंबाळकरांची (छत्री) समाधी, जुने बारव, विहिरी, भुईकोट किल्ला पाहण्यासाठी पर्यटक नियमितपणे येतात. त्यातच बसस्थानक परिसरामध्ये काही मोकाट जनावर मधोमध बसतात. त्यामुळे वाहन चालकांना रस्त्यात बसलेल्या जनावरांचा त्रास होतो. गावात काही वळू आहेत. यांची झुंज लागल्यावर वाहनांचे नुकसान होते.

### विवाहितेचा पैश्यासाठी सासरी छळ

नगर : विवाहितेचा सासरी पुणे येथे नांदत असताना त्यांचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला. सासरच्यांनी फ्लॅट खरेदीसाठी माहेरून सहा लाख रूपये आणण्याची मागणी केली, तसेच धमक्या दिल्या. या प्रकरणी सध्या अहिल्यानगर शहरातील कोठला भागात असलेल्या पीडित विवाहितेने तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून नऊजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिक्षकी पेशाला काळिमा फासणारी घटना

अकोले : तालुक्यातील कोतूळ येथे शिक्षकी पेशाला काळिमा फासणारी घटना घडली. एका शिक्षण संस्थेच्या सतरा ते अठरा शिक्षकांच्या पार्टीत मोठा राडा झाला आणि भांडण विकोपाला गेले, एका शिक्षकाने एका मुख्याध्यापकाला थेट बिष्णोई गँगची धमकी दिली आणि पळापळ झाली. अकोले तालुक्यात तीन माध्यमिक विद्यालये असलेल्या एका शिक्षण संस्थेच्या चार शिक्षकांच्या शिक्षक मान्यता सेवा निवृत्तीच्या शेवटच्या टप्प्यात मिळाल्या. मास्तर म्हणून मान्यता मिळाल्याप्रित्यर्थ पार्टी आयोजित केली.

## वाचकांच्या लेखणीतून



### हल्लेखोर बिबट्यांचा बोभाटा

सरपंच अशोकराव मुळे यांची मागणी अशी देवीभोयरे गावातील हल्लेखोर बिबट्यांच्या धुमाकुळाची बातमी वाचली (पारनेर दर्शन, १ डिसेंबर, रविवार).

काही वर्षांपूर्वी याच संदर्भात 'खो गया है कहीं जवाब मेरा!' या मथळ्याचा एक वृत्तपत्रीय लेख मी लिहिला होता. यात बिबट्यांसारख्या अन्यायपीडित वन्य पशूंची मी पाठराखण केली होती. मात्र यातही वनविभागाची जबाबदारी दुर्लक्षित केली नव्हती.

बिबट्यांनी ग्रामीण भागांत सगळीकडेच धुमाकूळ घातलेला आहे. हे वन्य पशू कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, वासरे आणि प्रसंगी शाळकरी मुलांवरही हल्ले करीत आहेत. ही गोष्ट समाजस्वास्थ्याला हानीकारक आहे. बऱ्याच दिवसांपासून वन विभागाचे नाव या संदर्भात बदनाम होत चालले आहे. या बातमीतला सूरही तसाच आहे.

लफ़्ज़ों के रेग़ज़ार में मफ़्हूम खो गये।
सब बात तोलते हैं कोई छानता नहीं।।

शब्दांच्या वाळवंटात अर्थ हरवले आहेत. सगळे शब्द फक्त तोलतात. चाळून घेत नाहीत.

वन विभागाने 'पारनेर दर्शन'कारांचे शब्द चाळून घ्यावेत आणि अशी प्रलंबित मागणी धसास लावण्यासाठी आता तरी ठोस पावले उचलावीत, ही अपेक्षा.

**नाना ढवळे,** ८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

# शिवबा दुर्गसंवर्धन समिती आयोजित किल्ला बनवा स्पर्धेला मोठा प्रतिसाद

## साहिल दिलीप लंके या विद्यार्थ्याला सायकलचे बक्षीस

**निघोज : प्रतिनिधी**

निघोज येथील शिवबा दुर्गसंवर्धन समिती आयोजित किल्ला बनवा स्पर्धेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून दिवाळीच्या सुट्टीचा पूरेपूर फायदा उठवीत निघोज, वडनेर, पठारवाडी, जवळा, देवीभोयरे, पिंपरी जलसेन येथील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन हजारो रुपयांची वस्तूरुपी बक्षीसे पटकावली आहेत.

यामध्ये निघोज येथील मुलिका देवी विद्यालयाचा विद्यार्थी साहिल दिलीप लंके याने राजगड किल्ला प्रतिकृती तयार करून सायकल प्रथम क्रमांक बक्षीस मिळवले आहे. जवळा येथील धर्मनाथ विद्यालयाचा विद्यार्थी श्रीकांत साहेबराव घुले याने प्रतापगड किल्ला प्रतिकृती तयार करून अभ्यासासाठी असणाऱ्या टेबलचे द्वितीय क्रमांक पारितोषिक मिळवले आहे. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक वडनेर येथील न्यू इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी जलदुर्ग - मुरुड जंजिरा किल्ला प्रतिकृती तयार करून फळा पारितोषिक मिळवले आहे.चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक जवळा येथील धर्मनाथ विद्यालयाचा विद्यार्थी तन्मय सुर्यकांत सालके या विद्यार्थ्यांनी मुरुड जंजिरा किल्ला प्रतिकृती तयार करून मिळवले आहे. पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक मुलिका देवी विद्यालयाचा विद्यार्थी साई राजू लंके याने किल्ला प्रतापगड प्रतिकृती तयार करून मिळवले आहे.

उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक पारितोषिक देवीभोयरे येथील अंबिका विद्यालयाचा विद्यार्थी शिवम शामराव काळे याने तसेच द्वितीय क्रमांक मुलिका देवी विद्यालय विद्यार्थी श्रेया अशोक लाळगे हिने मिळवले आहे. जवळा येथील सह्याद्री इंग्लिश मेडियम स्कूलचा विद्यार्थी निशांक खंडू हिंगे याने तृतीय क्रमांक बक्षीस मिळवले आहे. चतुर्थ क्रमांकाचे बक्षीस पिंपरी जलसेन विद्यार्थी आर्य शहाजी पठारे याने मिळवले आहे.पाचवे बक्षीस मुलिका देवी विद्यालय विद्यार्थी शिवम कुंडलिक पठारे याने मिळवले आहे.



किल्ले बनवा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला यावेळी विद्यार्थी व मान्यवर.

या सर्व विद्यार्थ्यांना शिवबा दुर्गसंवर्धन समिती व शिवबा संघटना महाराष्ट्र राज्य तसेच पारनेर व शिरुर तालुका व पदाधिकारी तसेच सदस्य यांच्या वतीने देण्यात आले आहेत. यामध्ये तब्बल तीस हजार पेक्षा जास्त रकमेची वस्तुरुपी बक्षीसे देण्यात आली. तसेच प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना शेवंताबाई रामदास कवडे यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध कलाशिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांच्या वतीने प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह तसेच शिवचरित्र देण्यात आले.

शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, तालुका अध्यक्ष बबनराव तनपुरे, प्रमुख पदाधिकारी राजूभाऊ लाळगे, बाळासाहेब भंडारी, रायचंद गुंड, रोहिदास लामखडे, मच्छिंद्र लाळगे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी किल्ला बनवा स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळण्यासाठी प्रयत्न केले. दिवाळीची विद्यार्थ्यांची सुट्टी आनंदमय होण्यासाठी हा ऐतिहासिक उपक्रम शिवबा दुर्गसंवर्धन समिती यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असून शिवबा संघटना व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना मोठ्या प्रमाणात सहकार्य होत आहे.

धुळे येथील प्रसिद्ध चित्रकार व इतिहास तज्ञ प्रल्हाद दगडू सोनार व नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील इतिहास तज्ञ व शिल्पकार चतुर्भुज विनायक शिंदे यांनी या किल्ल्यांचे परिक्षण केले. तसेच यावेळी प्रसिद्ध कलाशिक्षक व सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामदास कवडे यांचे नातू जयेश कवडे यांनी व्हिडिओ माध्यमातून मोठ्या पडद्यावर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या किल्ल्या प्रतिकृतीची सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या किल्ल्यांची माहिती फारच उपयुक्त होती.

यावर चर्चा करताना शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद यांचे सुत्रसंचलन फारच प्रेरणादायी ठरले. या गडावर प्रत्यक्षात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज त्यांच्या मावळ्यांसहीत असल्याचा भास यावेळी उपस्थितांना झाला. याबद्दल शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद व विद्यार्थी यांचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन करीत पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष व पत्रकार संघ विभागीय कार्यालय समन्वयक दत्तात्रय उनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ, माळवाडीचे सरपंच व शिवबा संघटनेचे शिरुर तालुका अध्यक्ष सोमनाथ भाकरे, शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद, प्रसिद्ध कलाशिक्षक ज्ञानेश्वर कवडे, ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, तालुका अध्यक्ष बबनराव तनपुरे, प्रमुख पदाधिकारी राजूशेठ लाळगे, मच्छिंद्र लाळगे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, प्रेस फोटोग्राफर जयसिंग हरेल, मावळे सर, घुले सर , दिलीप लंके, साहेबराव घुले, तान्हाजी बोरुडे, सुर्यकांत सालके, राजू लंके, शामराव काळे, अशोक लाळगे, खंडू हिंगे, शहाजी पठारे, कुंडलिक पठारे आदी तसेच पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ यावेळी म्हणाले गेली अनेक वर्षांपासून शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, ऐतिहासिक कार्यात सहभागी होऊन सामाजिक कामांच्या माध्यमातून शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अद्वितीय कामगिरी केली आहे. गाव व परिसराचा नावलौकिक वाढविण्यासाठी शिवबा संघटना शिवदुर्ग समिती यांनी विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने स्पर्धा माध्यमातून ऐतिहासिक महत्त्व समजून देण्याचे कार्य केले असून शिवछत्रपतींचा इतिहास अधोरेखित करण्याचे काम केले आहे.

माळवाडीचे सरपंच सोमनाथ भाकरे यांनी सांगितले की आजच्या युगात ऐतिहासिक महत्त्व विषद करण्याची गरज असून हेच काम शिवबा संघटनेच्या माध्यमातून होत असून या संघटनेत काम करताना ऐतिहासिक महत्त्व वाढत असून हाच आमचा अभिमान आहे. ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद यांनी शिवबा दुर्गसंवर्धन समीतीचे कौतुक करताना सांगितले की गेली अनेक वर्षांपासून या समीतीने किल्ला पाहाणी मोहीम राबवून परिसर स्वच्छ करण्याचे काम केले आहे. सरकारच्या माध्यमातून या ऐतिहासिक किल्ल्याचे नूतनीकरण होण्याची गरज असून यासाठी शिवबा संघटनेने राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद यांनी शिवबा दुर्गसंवर्धन समीती व शिवबा संघटनेचे कौतुक करताना सांगितले की अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ऐतिहासिक विषय घेत आजच्या विद्यार्थ्यांना किल्ल्याचे महत्व खऱ्या अर्थाने सांगत छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या मावळ्यांना हे किल्ले तयार करताना किती त्रास झाला याचे महत्त्व आजच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात समजले आहे. हिंदू जनजागृती सर्वाधिक महत्वाची असून यासाठी सर्वांनी दक्ष राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषनात मोदी सरकारचे विषेश कौतुक करताना सांगितले की छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास स्मरणात राहण्यासाठी हे सरकार हिंदूत्व भुमिका जागवीत असून हिंदू जनजागृती करण्यासाठी मोदी सरकारचे धोरण समाजाभिमुख व गौरवास्पद आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजूशेठ लाळगे व बाळासाहेब भंडारी यांनी केले. शेवटी शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, रोहिदास लामखडे, मच्छिंद्र लाळगे, रायचंद गुंड यांनी आभार मानले.



## डॉ.विखे पाटील कृषी महाविद्यालयात जागतिक एड्स दिन

### जनजागृती कार्यक्रम संपन्न; वक्त्यांचे मार्गदर्शन

**नगर : प्रतिनिधी**

डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत जगभर पसरलेल्या एड्स या जिवघेण्या रोगा बद्दल जनजागृती व्हावी म्हणून दरवर्षी १ डिसेंबर हा एड्स दिन म्हणून पाळला जातो.जागतिक एड्स दिनाचा उद्देश एचआयव्ही किंवा एड्स टाळण्यासाठी लोकांमध्ये जागरुकता पसरवणे, एड्स किंवा एचआयव्ही ग्रस्त लोकांशी भेदभाव थांबविणे आणि लोकांना शिक्षीत करणे हा आहे.

या कार्यक्रमासाठी डॉ.विखे पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल चे डॉ.डि.एम धामणे व डॉ.सौ. शुभदा अवचट प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते.तसेच महाविद्यालय चे प्राचार्य डॉ.एम. बी.धोंडे यांचे अध्यक्षतेखाली सदरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी उपस्थितांना डॉ.धामणे यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की,माझे आरोग्य,माझा हक्क या थिमच्या अनुषंगाने एड्स चा इतिहास सांगुन तो होण्याची कारणे, प्रतिबंध आणि समाजामध्ये एड्स रोगाबद्दल असणारे गैरसमज दुर करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थितांना डॉ.सौ.अवचट म्हणाल्या की, एड्स रोगाबद्दल चुकीचा प्रचार व प्रसार असुन, तसेच लैंगिक संबंधांबद्दल माहिती सविस्तर पणे सांगितली.

यावेळी महाविद्यालया मध्ये प्राचार्य डॉ.एम. बी.धोंडे यांनी एचआयव्ही एड्स पासून संक्रमणाचे मार्ग व प्रतिबंधात्मक उपाय तसेच व्यसनाधीन न राहता सामाजिक बांधिलकेबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.के.एस.दांगडे यांनी केले.आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ.एस.बी.राऊत यांनी केले.

## कॅफेच्या नावाखाली अश्लील चाळे

### पोलिसात गुन्हा दाखल

**नगर : प्रतिनिधी**

महाविद्यालयीन मुला-मुलींना कॅफेच्या नावाखाली अश्लील चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणा-या कॅफे चालक व मालक यांचेवर कोतवाली पोलीसांची कारवाई करून एकजण ताब्यात घेतला आहे. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवप्रसाद कुमार (वय २० रा. प्ररबुजुर्ग फतेहपुर उत्तर प्रदेश ह.रा. स्वामी शंकर हॉटेल कल्याण बायपास अहिल्यानगर), महेश पोपट खराडे (रा. रभाजीनगर केडगाव अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्याची नावे आहेत. तसेच महाविद्यालयीन मुले व मुलींना समज देऊन सोडण्यात आले. ही कारवाई कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने केली.



## लाडक्या बहिणींना करावी लागणार वर्षभराची प्रतीक्षा

### मुनगंटीवार : २१०० रुपयांसाठी भाऊबीजेचा मुहूर्त



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीने सत्ता स्थापन केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी महायुतीच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेच्या रकमेत वाढ करत २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. सरकार स्थापन झाल्यावर खरेच रकमेत वाढ होणार की केवळ निवडणुकीसाठी आश्वासन आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी उत्तर दिले आहे.

एका वृत्तपत्राला मुलाखत देताना सुधीर मुनगंटीवार यांना प्रश्न विचारण्यात आला की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दिल्या जाणाऱ्या रकमेत वाढ करू. महिलांना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. ते आश्वासन पूर्ण कराल का? करण राष्ट्रवादीने म्हटले आहे की हे आश्वासन केवल एकनाथ शिंदे यांचे होते. यावर उत्तर देताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आम्ही १०० टक्के ते आश्वासन पूर्ण करू. महिलांना दिली जाणारी रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपये अशी वाढवली नाही तर देशात आमची प्रतिमा खराब होईल. निवडणुका जिंकल्यावर आश्वासन पूर्ण न करणारे अशी आमची प्रतिमा देशभर पसरवली जाईल.

पुढे बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे की आपण आपल्या शब्दांवर ठाम राहायला हवे. महायुतीचा जाहीरनामा समितीचा अध्यक्ष या नात्याने मी आमच्या जाहिरनाम्यातून, संकल्प पत्रातून दिलेली आश्वासने धुळीस मिळू देणार नाही. आमच्या सरकारमध्ये प्रत्येक पात्र महिलेला २१०० रुपये देण्याची क्षमता आहे. मला वाटत नाही की आमचा कोणताही मित्रपक्ष याला विरोध करेल. ही वाढीव रक्कम कोणत्या महिन्यापासून द्यायची यावर चर्चा केली जाईल. आम्ही गेल्या वर्षी भाऊबीजेच्या दिवशी ही योजना लागू केली होती. त्यामुळे आम्ही पुढील वर्षी भाऊबीजेपासून रक्कम वाढवू शकतो, असे सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी महायुतीने लाडकी बहीण योजनेचा देखील चांगलाच प्रचार केला होता. याचा फायदा निवडणुकीत मतदानातून झाला असल्याचे दिसत आहे. तसेच महायुतीच्या नेत्यांनी त्यांच्या या विजयाचे श्रेय लाडक्या बहिणींनाच दिले आहे. तसेच लाडकी बहीण योजना ही महिलांना थेट आर्थिक लाभ देणारी योजना निवडणुकीत निर्णायक ठरली असल्याचे मत देखील राजकीय विश्लेषकांनी मांडले आहे.

# अकोलेतील शाळेत निनादले जपानी लोकगीताचे सूर!

## विद्यार्थ्यांना सांगितले स्वयंशिस्तीचे महत्त्व



**अकोले : प्रतिनिधी**

जपानमधील कादंबरीकार, संगीतकार रेईको साकानोई यांनी वीरगाव (ता. अकोले) शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भारतीय शास्त्रीय संगीतातील एक बंदिश केलीच खेरीज जपानमधल्या लोकगीताचे कर्णमधूर सूर वीरगाव शाळेत निनादले. त्यावर टाळ्यांचा गजर करत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली.

**आयुष्यातल्या स्वयंशिस्तीचे विद्यार्थ्यांना सांगितले महत्त्व**

सर्वांशी प्रेमाने वागा, निराश न होता स्वत:ला सतत आनंदी ठेवा, असा सल्ला देत जपानमधील लोकांच्या जेवणातील खाद्यपदार्थ, त्यांच्या आनंदी, दीर्घ आयुष्यामागील रहस्य उलगडून सांगताना आयुष्यातले स्वयंशिस्तीचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांकडून तीन वचने घेत रेईको साकानोई यांनी विद्यार्थ्यांशी दिलखुलास गप्पा मारल्या. जपानमधील कादंबरीकार, संगीतकार आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील उद्योजक रेईको साकानोई यांनी नुकतीच वीरगाव शाळेला भेट दिली. विद्यार्थ्यांशी सहज सुंदर संवाद साधला. रेईको यांच्या बोलण्याचे प्रा. डॉ. मुग्धा महाले यांनी भाषांतर केले. जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापक शैला भोईर, विवेकानंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुदर्शन ढगे यावेळी उपस्थित होते.

रेईको यांनी यावेळी विद्यार्थ्यांकडून तीन वचने घेतली. आई-वडील, शिक्षक आणि आपल्या पूर्वजांचा सन्मान करू. समाजाने, देशाने मला काय दिले? याचा विचार करण्यापेक्षा मोठे होऊन आम्ही देशाला काहीतरी देण्याचा प्रयत्न करू, देशाबद्दल अभिमान बाळगू. पृथ्वी आपली सगळ्यांची आई आहे, आपण सारे तिची लेकरे आहोत. जगभरातील सर्व माणसांशी बंधुभावाने आणि प्रेमाने वागू. जपानमधील शाळेची वेळ, तेथील खाद्य संस्कृती, आनंदी जीवनाचे रहस्य याबाबत विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची रेईको यांनी दिलखुलास उत्तरे दिली. जपानी संगीतकार असलेल्या रेईको गेली दोन वर्षे भारतीय शास्त्रीय संगीत शिकत आहेत. त्यांनी संस्कृतमधील गीत सादर करत सर्वांची मने जिंकली.

शाळेला भेट देऊन आनंद झाल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली. कंटाळा न करता मुलांसोबत सेल्फी, फोटो घेतले. रेईको यांच्या मागणीनुसार शाळेतील विद्यार्थिनीनी समूहगीत सदर केले. हार्मोनियमवर साथ देणार्या अबोली ढमाले हिचे त्यांनी कौतुक केले. मुग्धा महाले यांनी परिचय करून दिला. भाऊसाहेब चासकर यांनी प्रास्ताविक केले. भास्कर आंबरे यांनी आभार मानले. सुरेश आरोटे, रावसाहेब सरोदे, मीनल चासकर, वैजयंता आंबरे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# राजकारणापेक्षा समाजकारणावर भर : आ. काशिनाथ दाते

## वासुंदे ग्रामस्थांच्या वतीने आ. दाते यांचा सत्कार

**वासुंदे : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीमध्ये सर्वसामान्य जनतेने मला मतदान करून तालुक्यात परिवर्तन घडविले आहे. आता राजकारणापेक्षा आपला समाजकारणावर भर राहणार असल्याचे सांगत नवनिर्वाचित आमदार काशिनाथ दाते यांनी आपल्या वाटचालीचा अजेंडा मांडला.

विधानसभा सदस्यपदी निवड झाल्याबद्दल आ. दाते यांचा वासुंदे ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये काम करताना आपण अनेक विकास कामे माग लावली. जनतेचे प्रश्न सोडविले. त्यामुळे माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती होती. मतपेटीतून मतदारांनी ते दाखवून दिले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला मा. आ. स्व. वसंतराव झावरे यांच्या अर्धकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वसंत चेडे, राजेंद्र उबाळे, अरूण ठाणगे, बाबासाहेब खिलारी, विक्रमसिंह कळमकर, सागर मैड, संतोष गायकवाड, अमोल साळवे, दत्ता जगदाळे, किसन धुमाळ, विकास रोकडे, निजाम पटेल, रणजित पाटील, शरद पाटील, भाऊसाहेब सैद, दिलीप पाटोळे, शंकर बर्वे, नारायण झावरे, जालिंदर वाबळे, रामचंद्र झावरे, विलास साटे, बाळासाहेब झावरे, बाळासाहेब शिंदे, मारूती उगले, लहानभाऊ झावरे, लक्ष्मण झावरे, खंडू टोपले, सगाजी दाते, किरण पोपळघट, स्वप्निल झावरे, पोपटराव झावरे आदी उपस्थित होते.



वासुंदे ग्रामस्थांच्या वतीने आ. काशिनाथ दाते यांचा सुजित झावरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### सुजित पाटलांची मोलाची भूमिका

येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूकांमध्ये महायुतीच्या माध्यमातून लढवून ताकदीनीशी या निवडणूका जिंकण्यात येतील. सुजित झावरे पाटील यांनी मला आमदार करण्यासाठी मोलाची भूमिका बजावली. त्यांचे पुनर्वसन करून त्यांच्या पाठीशी ताकद उभी करणार आहोत.

### स्व.दादांचे संस्कार

वासुंदे व परिसरात विकास कामे करताना कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही. स्वर्गीय वसंतरावदादा झावरे यांचे आमच्यावर संस्कार असून त्यांचा तालुक्यातील संस्कारक्षम राजकारणाचा वारसा आम्ही यापुढील काळातही आम्ही पुढे नेणार आहोत.

### तांबडीकार प्रकल्पाला प्राधान्य द्या

काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून तालुक्यामध्ये अनेक विकास कामे मार्गी लागणार आहेत. तालुक्याच्या उत्तर भागाला वरदान ठरणारा तांबडीकार प्रकल्पाचा प्रश्न त्यांनी माग लावावा. हा प्रश्न माग लागल्यास खऱ्या अर्थाने हा भाग सुजलाम सुफलाम होणार आहे. दाते यांना आमदार करण्यासाठी टाकळी ढोकेश्वर गटाने सर्वाधिक मताधिक्य दिले.

**- सुजित झावरे पाटील,** मा. उपाध्यक्ष, जि प नगर

# जनता, ढोकेश्वर, समर्थ, पारनेर पब्लिक स्कूल, इरा, पारनेर महाविद्यालय नाटय स्पर्धेत विजेतेपद

## क्रांतिकारक सेनापती बापट शालेय नाट्य स्पर्धा

**पारनेर : प्रतिनिधी**

क्रांतिकारक सेनापती बापट शालेय नाट्य स्पर्धा मध्ये जनता विद्या मंदिर कान्हूर पठार, ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर, पारनेर महाविद्यालय, समर्थ इंग्लिश स्कूल, म्हसणे, पारनेर पब्लिक स्कूल, इरा इंटरनॅशनल स्कूल, जवळे, न्यु इंग्लिश स्कूल पारनेर यांनी विजेतेपद पटकावले.

आडवाटेच पारनेर व पारनेर महाविद्यालय आयोजित क्रांतिकारक सेनापती बापट शालेय नाट्य स्पर्धा बक्षीस वितरण महाराष्ट्र साहित्य साधना मंचचे संस्थापक संजय पठाडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धासाठी कन्हैया अॅग्रो, पारनेर महाविद्यालय प्राचार्य डॉ.लक्ष्मण मतकर, शिवतेज सामाजिक प्रतिष्ठान, बाभुळवाडे, सिन्नर पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड, गायत्री कॉम्प्युटरचे प्रमुख इंद्रजित देशमुख हे सहप्रायोजक होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून कलाशिक्षक संघटनेचे अध्यक्ष कानिफनाथ गायकवाड, साहेबराव घुले, कलाश्रृती वाळूंज यांनी काम पाहिले.

> आडवाटेच पारनेर यांनी पारनेरचे सुपुत्र थोर क्रांतिकारक सेनापती बापट यांच्या नावाने सुरू केलेली क्रांतिकारक सेनापती बापट शालेय नाट्य स्पर्धा ही गुणवंतांना न्याय देणारी असून प्रा.तुषार ठुबे व युवकांच्या या सामाजिक कार्याला पाठबळ देण्याचे काम सर्वांनी करावे.
>
> **- संजय पठाडे**
> संस्थापक, महाराष्ट्र साहित्य साधना मंच

स्पर्धामध्ये पहिली ते सातवी

प्रथम:- जनता विद्या मंदिर, कान्हुरपठार, द्वितीय:- इरा इंटरनॅशनल स्कूल, जवळे, तृतीय :- पारनेर पब्लिक स्कूल

चतुर्थ :- सेनापती बापट विद्यालय पारनेर, उत्कृष्ट अभिनय आराध्या खोसे, विराज ठुबे उत्कृष्ट दिग्दर्शन स्वानंद ठूबे, आठवी ते बारावी गटात - न्यू आर्ट कॉलेज पारनेर, समर्थ म्हसणे फाटा, न्यू इंग्लिश स्कूल पारनेर, उत्कृष्ट अभिनय भार्गशी शिरोळे, सुनील कोल्हे

**उत्कृष्ट दिग्दर्शन**

किरण लोखंडे, महाविद्यालय गटात ढोकेश्वर महाविद्यालय, जनता विद्या मंदीर, कान्हुरपठार, ढोकेश्वर विद्यालय

**उत्कृष्ट अभिनय**

कार्तिकी शंकर गुंड, सुजल सोनावळे, उत्कृष्ट दिग्दर्शक

**प्रा संकेत ठाणगे**

यावेळी उपप्राचार्य डॉ तुकाराम थोपटे, पर्यवेक्षक संजय कोल्हे, एनसीसी चे प्रमुख प्रा भरत डगळे, अशोक महाराज शिंदे, आडवाटेच पारनेरचे प्रमुख प्रा तुषार ठुबे, अशोक गायकवाड, पारनेर तालुका कला शिक्षक संघाचे अध्यक्ष कानिफनाथ गायकवाड, साहेबराव घुले, मराठी विभाग प्रमुख प्रा हरीश शेळके, कलाश्रृती वाळूंज, मीरा पुजारी, कारभारी बाबर, प्रा संकेत ठाणगे, महाबली मिसाळ, प्रा दिपक जाधव, , प्रा शर्मिला मगर, रितीका ठुबे उपस्थित होते.



क्रांतिकारक सेनापती बापट शालेय नाट्य स्पर्धा बक्षीस वितरण करण्यात आले.

# अपधूपला शनिवारी चंपाषष्ठी उत्सव


## हजारो भाविक घेणार दर्शनाचा लाभ

**सुपा : प्रतिनिधी**

पारनेर तालुक्यातील आपधूप येथील श्रीक्षेत्र खंडेश्वर देवस्थान ट्रस्ट आयोजित भव्य चंपाषष्ठी उत्सव २०२४ शनिवार दिनांक ७ डिसेंबर रोजी खंडेरायाचा उत्सव होत असून मल्हार मार्तंड खंडेराया बाणाई माता म्हाळसाई माता मूर्ती अभिषेक सकाळी ६ वाजता ब्राह्मण काकाच्या साक्षीने संपन्न होईल. त्यानंतर देवाला नवीन कपडे अर्पण केले जातील सकाळी ७:३० वाजता महाआरती होईल.

आलेल्या भक्तांसाठी सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली असून त्याच बरोबर दिवसभर जागरण गोंधळाचा कार्यक्रम होणार आहे या भक्तिमय वातावरणामध्ये खंडेरायाचा उत्सव साजरा होत असून आपधूप गावचे सुपुत्र उद्योजक ग्रामरत्न सुरेशशेठ धोंडीबा गवळी यांनी या उत्सवासाठी ५१ हजार रुपयाची देणगी दिली आहे. गावांमधील भाविक भक्तांनी बाजरी तेल शेंगदाणे तांदूळ वांगी यथाशक्तीप्रमाणे आर्थिक मदतीमुळे हा कार्यक्रम भव्यदिव्य होत असून हा नवसाला पावणारा देव आहे.

नगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून मल्हार मार्तंडाचे भक्तगण चंपाषष्ठी उत्सव निमित्त मल्हार मार्तंडाला साकडे घालण्यासाठी येत असतात चंपाषष्ठी उत्सवानिमित्त विद्युत रोषणाईची पूर्ण तयारी झाली असून शनिवार दिनांक ७ डिसेंबर रोजी हा चंपाषष्ठी उत्सव संपन्न होत आहे. परिसरातील भाविक भक्तांनी या उत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.




(छाया - शरद रसाळ, सुपा)

# आहिल्यानगरच्या लेकींनी पटकावले क्रिकेटचे विजेतपद

## राज्य टेनिस क्रिकेट स्पर्धेत प्रथम

**सुपा : प्रतिनिधी**

नाशिक येथे संपन्न झालेल्या १९ वर्ष वयोगटातील राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगर संघाने विजेतेपद पटकावले.

दि. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान या स्पर्धा महाराष्ट्र टेनिस असोशिएशनद्वारे आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये अहिल्यानगरच्या लेकींनी फलंदाजी , गोलंदाजी व क्षेत्ररक्षणात जबरदस्त कामगिरी करत धाराशिव ,सांगली व अंतिम सामन्यामध्ये बलाढय नाशिक संघाचा पराभव करत प्रथम क्रमांकाचे विजेतेपद मिळविले.

या मुलींच्या संघाची २७ डिसेंबर ते ३०डिसेंबर रोजी मथुरा (उत्तर प्रदेश ) येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू व सर्वोत्कृष्ट फलंदाज म्हणून कर्णधार वृषाली पारधी हिची निवड झाली. तर उत्कृष्ट फलंदाजीच्या जोरावर समिक्षा वाळुंज अंतीम सामन्याची मानकरी ठरली.

संघाच्या या यशाबद्दल टेनिस क्रिकेट असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष केशव नागरगोजे, खजिनदार संदीप घावटे, सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व कुलगुरू पी.जी.पाटील, सचिव महानंदजी माने, प्राचार्य अरुणजी तूपविहीरे, उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, देवदैठणचे प्राचार्य विशाल डोके, पर्यवेक्षक नामदेव डुंबरे, शिक्षक वर्ग आदींनी अभिनंदन केले आहे.




**राज्य विजेता संघ पुढीलप्रमाणे :** वृषाली पारधी ( कर्णधार ), संतोषी भिसे, प्रणाली पानसंबळ, धनश्री शेडगे, सिमरन शेख, श्रावणी ढगे, मृणाल ननवरे, राशी पवार (सर्व राहूरी ), समीक्षा वाळुंज ,साक्षी बनकर, श्रावणी कांडेकर (सर्व देवदैठण )

सर्व खेळाडूंना सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयचे क्रीडा शिक्षक व क्रिकेट प्रशिक्षक घनश्याम सानप , संदीप घावटे व कांता मांडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

# दिग्विजय वाखारे यांची असिस्टंट कमाडंटपदी निवड


## देशाच्या तटरक्षक दलामध्ये नियुक्ती

**राळेगण थेरपाळ : प्रतिनिधी**

गोलेगांव ता. शिरूर, जि. पुणे येथील दिग्विजय वाखारे यांची देशाच्या तटरक्षक दलाच्या असिस्टंट कमाडंट वर्ग एक या पदावर नुकतीच निवड झाली.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या भारतीतय तटरक्षक दलामध्ये असिस्टंट कमाडंट पदापर्यंत पोहचताना दिग्विजय यांनी अतिशय खडतर परिश्रम घेतले. दिग्विजय यांचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण हे शिरूर शिक्ष्‍ाण प्रसारक मंडळाच्या विद्याधाम प्रशाला येथे झाले. त्यानंतर दिग्विजय यांनी नाशिक येथील के के वाघ महाविद्यालयात बी टेक पुर्ण केले. पुणे येथील वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अंतर्गत संरक्षण मंत्रालयाच्या विद्यापीठामध्ये सध्या ते एमबीए करत आहेत.

दिग्विजय यांचे आई वडील डॉ. अनिल विठ्ठलराव वाखारे व सीमा अनिल वाखारे हे प्राथमिक शिक्षक आहेत. राळेगणथेरपाळ येथील पत्रकार जयदिप कारखिले, सागर कारखिले यांचा दिग्विजय हा भाचा तर जिल्हा सहकारी बँकेचे लेखापरिक्षक शामराव कारखिले यांचे ते नातू आहेत.



त्यांच्या निवडीबद्दल राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले, गोलेगांवच्या सरपंच दिपाली पडवळ, शिरूर येथील नेत्रतज्ञ डॉ. स्वप्निल भालेकर, डॉ. राम मगर, अॅड. निनाद मगर यांच्यासह शिरूर परिसरातील शिक्षक संघटना, पदाधिकारी यांनी दिग्विजय यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# उसाचे दर जाहिर करा, मागील वर्षाचे पेमेंट द्या ; भुमिपुत्र शेतकरी संघटनेची मागणी

**पारनेर : प्रतिनिधी**

सन २०२३-२४ या गळीत हंगामात देसवडे, मांडवेखुर्द आणि परिसरातून शेतकऱ्यांचा उस मोठया प्रमाणावर माळकुप येथील ग्रीड एनज या कारखान्यास देण्यात आला आहे. मागील वर्षीचे २०० रूपये प्रतिटनाप्रमाणे पेमेंट करून यंदाचा दरही जाहिर करा अशी मागणी भुमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

मागिल वर्षी उसाची तोडणी करण्यापुर्वी कारखान्याच्या कार्यकारी संचालकांनी विविध गावांमध्ये येवून बैठक इतर कारखान्यांप्रमाणे उसाला भाव देण्याचे अश्वासन दिले होते. मागील वर्षीचा हिशोब बाकी असतानाच यंदाच्या हंगामातील उस तोडही सुरू करण्यात आली आहे. शेजारील संगमनेर कारखान्याने अंतिम दर ३ हजार रूपये दिला आहे. त्यामुळे कारखाना व्यवस्थापनाने दिलेल्या शब्दाप्रमाणे उर्वरीत २०० रूपये टनाप्रमाणे शेतकऱ्यांना पैसे देण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली आहे.



ग्रीड एनर्जी या कारखान्याने उसाचे दर जाहिर करावेत आण मागील वर्षीचे पेमेंट द्यावे या मागणीचे निवेदन कारखाना व्यवस्थापनास देण्यात आले.

यंदाचा गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर कारखान्याने कोणताही दर जाहिर न करता उस तोड चालू केल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. त्यामुळे कारखाना व्यवस्थापनाने अगोदर उसाचा दर जाहिर करावा व त्यानंतरच उसतोड सुरू करावी. या दोन्ही मागण्यांची दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी कारखाना व्यवस्थापनाला देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. भुमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे चेअरमन महेश करपे यांना देण्यात आले.

यावेळी सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, दत्ता फटांगरे, मा. चेअरमन संजय भोर, अविनाश भोर, संतोष काकडे, संपत फटांगरे, अण्णा भोर, भाऊसाहेब खाडे, मंजाबापू वाडेकर, बाबासाहेब टेकुडे, रावसाहेब गोळे, महिपती दरेकर, नवनाथ जाधव यांच्यासह शेतकरी यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# भारतीय संस्कृतीचे संवर्धन हे आपले कर्तव्य

## चंद्रकांत चेडे यांचे प्रतिपादन

**पारनेर : प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीचे संवर्धन करणे हे आपले प्रथम कर्तव्य असल्याचे सांगतानाच किसान स्कुलमध्ये नेहमीच भारतीय संस्कृतीच्या संवर्धनासाठी प्राधान्य दिले जात असल्याचे प्रतिपादन किसान स्कुलचे संचालक चंद्रकांत चेडे यांनी केले.

किसान शैक्षणिक संकुलामध्ये ट्रॅडिशनल डे मोठया उत्साहात पार पडला. यावेळी चेडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. ते म्हणाले, किसान संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येउन विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव दिला जातो. निबंध, वकृत्व, किसान शेफ हस्ताक्षर स्पर्धांबरोबरच इतर स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला जातो.

शनिवारी किसान संकुलात टॅडिशनल डे चे आयोजन करण्यात आले होते. विविध गटांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत विद्यार्थी, विद्यार्थीनींनी देशाच्या विविध भागांतील पोषाख परिधान करत हा दिवस साजरा केला.महाराष्ट्रीय तसेच दाक्षिणात्य पोषाखांवर या स्पर्धेत अधिक भर दिसून आला. वेगवेगळया प्रकारची वेषभुषा करून विद्यार्थ्यांनी आपले लक्ष वेधून घेतले.



किसान स्कुलमध्ये ट्रॅडिशनल डे उत्साहात साजरा करण्यात आला.

किसान संस्थेमध्ये भारतीय संस्कृतीला महत्व देतानाच विविध प्रकारचे सण, उत्सव, महापुरूषांच्या जयंती, पुण्यतिथींचे आयोजन करण्याबरोबरच कला, क्रिडा स्पर्धांच्या माध्यमातूनही विविध उपक्रम राबविले जातात.

वेगवेगळया इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपआपली छायाचित्रे काढून आपल्याच वर्गाची वेषभुषा चांगली झाल्याचा दावा केला. या स्पर्धेच्या माध्यमातून संस्थेने परंपरनेचे जतन केल्याचे पहावयास मिळाले. यावेळी चंद्रकांत चेडे, उद्योजक ॠषीकेश चेडे, किसान स्कुलचे प्राचार्य मनोज राठोड यांच्यासह विविध विभागांचे शिक्षण, पालक उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com